महाराष्ट्र शासन
कृषी विभाग
नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प
३० अर्केड, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई ४०० ००५
दूरध्वनी क्र. ०२२-२२१६३३५१/५२ ई-मेल : pmu@mahapocra.gov.in

NDKSP-१३०८०(३१)/३/२०२५-१३/E-१७७४९२१ दि. ०२/०६/२०२६

प्रति,

१. विभागीय कृषी सहसंचालक, (छत्रपती संभाजीनगर, अमरावती, लातूर, नागपूर व नाशिक)

२. जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, प्रकल्पांतर्गत सर्व जिल्हे

**विषय :- ना.दे.कृ.सं.प्र. टप्पा-२ अंतर्गत सर्व २१ जिल्ह्यातील निवड केलेल्या ७२०१ गावांमध्ये असलेल्या अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीतील शेतकरी व सर्व महिला शेतकऱ्यांना ठिबक सिंचन व तुषार सिंचन या घटकास देय असलेले अनुदान वितरणासाठी "सेंट्रल बँक डिजिटल चलन (CBDC)" या कार्यपध्दतीचा अवलंब करण्याबाबत मार्गदर्शक सूचना.**

**संदर्भ :-** १. प्रस्तुत कार्यालयाचे पत्र क्र. NDKSP-१३०८०(३१)/३/२०२५-१३/E (२४२३७८५), दि. १९.१२.२०२५.
२.कृषी व पदुम विभाग पत्र क्र. कृवपदुम-१९०४६/२२/२०२५-MAG-८A(१०७०१६४), दि. १८.०५.२०२६.

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये, नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प टप्पा-२ मध्ये छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, लातूर, धाराशिव, परभणी, नांदेड, हिंगोली, जळगाव, अमरावती, अकोला, बुलढाणा, वाशिम, यवतमाळ, वर्धा, नाशिक, नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर व गडचिरोली अशा एकूण २१ जिल्ह्यांमध्ये अंदाजित रु. ६००० कोटी (रु. सहा हजार कोटी) किंमतीच्या जागतिक बँक अर्थसहाय्यित प्रकल्पाच्या टप्पा-२ ची अंमलबजावणी करण्यास कृषी व पदुम विभागाचा शासन निर्णय दि. ८.७.२०२५ अन्वये मंजुरी देण्यात आलेली आहे.

प्रकल्प टप्पा-२ अंतर्गत वैयक्तिक लाभार्थ्यांना विविध हवामान अनुकूल तंत्रज्ञानाचा अवलंब करणेसाठी अर्थसहाय्य दिले जात आहे. सदरील अनुदान वितरण करण्यासाठी प्रचलित Back-Ended Subsidy पद्धती अवलंबली जात आहे, ज्यामध्ये शेतकऱ्याने अगोदर स्वखर्चाने निवडलेल्या प्रकल्प घटकाची मार्गदर्शक सूचनांनुसार अंमलबजावणी करून काम पूर्ण केल्यास शेतकऱ्याला नियमानुसार अनुदान वितरीत करण्यात येत होते. मात्र अनेक शेतकऱ्यांकडे प्रारंभी भांडवल उपलब्ध नसल्यामुळे ते घटकाची अंमलबजावणी पूर्ण करू शकत नाहीत, हे निदर्शनास आले आहे. यावर पर्याय म्हणून संदर्भ क्र. १ अन्वये, प्रकल्प टप्पा-२ अंतर्गत प्रायोगिक तत्वावर नाशिक, नागपूर, चंद्रपूर या जिल्ह्यांमधील प्रकल्प गावांमधील अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीमधील शेतकऱ्यांना "ठिबक सिंचन" या घटकासाठी भारतीय रिझर्व बँकेच्या CBDC चलन कार्यपद्धतीचा अवलंब करून पंजाब नॅशनल बँकेच्या माध्यमातून Front-Ended Subsidy उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

संदर्भीय पत्र क्र. २ अन्वये, प्रकल्पांतर्गत २१ जिल्ह्यांमध्ये प्रकल्प गावांमधील **अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीतील शेतकरी व सर्व महिला शेतकऱ्यांना “ठिबक सिंचन" व "तुषार सिंचन" या घटकांसाठी अनुदान वितरण करण्यासाठी "सेंट्रल बँक डिजिटल चलन** (CBDC)" या कार्यपध्दतीचा अवलंब करण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे.

"सेन्ट्रल बँक डिजिटल चलन" (CBDC) हे भारतीय रिझर्व बँकेद्वारे वितरीत केलेले डिजिटल चलन आहे, जे भौतिक नोटा आणि नाण्यांप्रमाणेच कार्य करते आणि ते डिजिटल स्वरूपातच उपलब्ध आहे. या डिजिटल चलनावर भारतीय रिझर्व बँकेचे नियंत्रण आहे.

प्रकल्पांतर्गत ठिबक सिंचन व तुषार सिंचन या घटकासाठी वेळोवेळी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचना व क्षेत्रीय अधिकाऱ्यांच्या जबाबदाऱ्या पूर्वी प्रमाणेच राहतील.

P-CBDC अंतर्गत अनुदान प्रदान कार्यपद्धती (Process Flow) पुढीलप्रमाणे राहील-

१. प्रकल्पांतर्गत २१ जिल्ह्यांतील अनुसूचित जाती आणि जमातीतील शेतकरी तसेच, सर्व महिला शेतकरी "सेंट्रल बँक डिजिटल चलन (CBDC)" या कार्यपध्दतीचा अवलंब करून प्रकल्पाच्या डीबीटी पोर्टलद्वारे “ठिबक सिंचन”, "तुषार सिंचन" या घटकांसाठी अर्ज करतील.

२. ड़ीबीटी पोर्टलवर अर्ज केल्यावर शेतकऱ्याला दोन पर्याय उपलब्ध होतील.
अ) पारंपारिक अनुदान वितरण पद्धती (पूर्णतः स्वनिधी) (Back-Ended subsidy)
आ) P-CBDC द्वारे अनुदान वितरण पद्धती
इच्छुक शेतकऱ्याने अर्ज करताना P-CBDC द्वारे अनुदान वितरण हा पर्याय निवडावा.

३. अर्ज करण्यापूर्वी प्रोफाईल मधील मोबाईल क्रमांक स्मार्टफोनवर सक्रिय असल्याची खात्री करावी; अन्यथा मोबाईल क्रमांक अद्ययावत करावा.

४. P-CBDC पर्याय निवडून अर्ज केल्यानंतर Google Play Store/ App Store वरून PNB Digital Rupee App डाउनलोड करून, प्रोफाईल मध्ये वापरलेल्या मोबाईल क्रमांकाने पंजाब नॅशनल बँक अधिकाऱ्यांच्या मदतीने CBDC App वर स्वतःची नोंदणी करून घ्यावी. त्यासाठी शेतकऱ्याने पंजाब नॅशनल बँकेत स्वतंत्र खाते काढण्याची आवश्यकता नाही.

५. प्रकल्पांतर्गत सक्षम प्राधिकारी यांनी पूर्वसंमती दिल्यावर निधी उपलब्धतेच्या अधीन राहून अनुदानाच्या रक्कमेचे डिजिटल टोकन शेतकऱ्याच्या नावे तयार होईल आणि त्यांच्या नोंदणीकृत मोबाईल वर उपलब्ध करून दिले जाईल.

६. शेतकऱ्यांच्या CBDC वॉलेटमध्ये P-CBDC टोकन (Programmable Token) प्रकल्पांतर्गत विशिष्ट नियमांसह हस्तांतरित केले जातील. सदरील टोकनद्वारे लाभार्थ्याने निवड केलेल्या घटकासाठीच आणि कृषी विभागाकडे नोंदणीकृत व पंजाब नॅशनल बँकेच्या CBDC App मध्ये on-board झालेल्या विक्रेत्यासाठीच डिजिटल टोकनचा वापर करता येईल.

७. जिल्ह्यातील ठिबक सिंचन, तुषार सिंचन संचाच्या नोंदणीकृत विक्रेत्यांकडून खरेदी करण्यासाठी शेतकरी सदर टोकनचा वापर करतील. मात्र या डिजिटल टोकनचे हस्तांतरण करण्यासाठी शेतकऱ्याने ठिबक सिंचन, तुषार सिंचन संच खरेदी करण्यासाठी जो विक्रेता निवडलेला आहे, त्या विक्रेत्याने स्वतःच्या नावे पंजाब नॅशनल बँकेच्या CBDC App वर नोदणी करून CBDC वॉलेट कार्यान्वित करणे आवश्यक राहील. बँकेकडून अशा विक्रेत्यांना आर्थिक व्यवहारासाठी QR कोड उपलब्ध करून दिला जाईल.

८. नोंदणीकृत विक्रेत्यांना CBDC मध्ये onboard होण्यासाठी आवश्यक सहकार्य पंजाब नॅशनल बँकेच्या क्षेत्रीय अधिकाऱ्यांमार्फत केले जाईल. त्याकरिता पंजाब नॅशनल बँकेमध्ये स्वतंत्र खाते काढण्याची विक्रेत्यांना आवश्यकता नाही.

९. शेतकरी P-CBDC टोकन विक्रेत्याच्या CBDC वॉलेटमध्ये हस्तांतरित करण्यासाठी त्यांचा QR कोड स्कॅन करतील. त्यानंतर सदरील अनुदानाची अंदाजित रक्कम संबंधित विक्रेत्याच्या CBDC wallet मध्ये आभासी स्वरूपात जमा होईल. म्हणजेच अनुदान अदायगीची अंतिम प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत संबंधित विक्रेत्यास सदर रक्कम वापरासाठी उपलब्ध होणार नाही. ते डिजिटल टोकन BLOCK स्वरूपात राहील.

१०. शेतकऱ्याला प्रकल्पामार्फत अनुदानाच्या रकमे इतकेच डिजिटल टोकन उपलब्ध करून दिले जाईल. **उदा. प्रकल्पांतर्गत अनुसूचित जाती/ अनुसूचित जमातीतील शेतकऱ्याने ठिबक सिंचन घटकासाठी १.२० x ०.६० मीटर अंतरासाठी ०.४० हेक्टर (१ एकर) क्षेत्रासाठी अर्ज केल्यास मार्गदर्शक सुचेनुसार मंजूर मापदंड रु. ५७,२४१/-**

**एवढा असून शेतकऱ्याला मापडंदाच्या ९०% म्हणजेच एकूण रु ५१,५१७/- इतके अनुदान देय आहे.** सदर देय अनुदानाच्या रकमे एवढेच टोकन संबंधित शेतकऱ्याला P-CBDC द्वारे निर्माण केले जाईल.

११. अनुदान रक्कम वगळता ठिबक सिंचन, तुषार सिंचन संचाच्या खरेदी किमती मधील उर्वरीत रकमेबाबतचा व्यवहार हा संबंधित शेतकरी व नोंदणीकृत विक्रेत्यांच्या दरम्यानची खाजगी बाब असून याबाबत भारतीय रिझर्व बँक, कृषि विभाग आणि पंजाब नॅशनल बँक यांची कोणतीही जबाबदारी या प्रती असणारं नाही.

१२. शेतकऱ्याने प्रकल्प घटकांतर्गत खरेदी केलेले ठिबक सिंचन, तुषार सिंचन संच बसवल्यावर (Installation) लाभार्थी प्रकल्पाच्या डीबीटी पोर्टलवर जाऊन खरेदीची देयके व अनुषंगिक कागदपत्रे अपलोड करतील.

१३. संबंधित क्षेत्रीय अधिकारी यांचे मार्फत सदर ठिबक सिंचन, तुषार सिंचन संचाची मोका तपासणी प्रचलित मार्गदर्शक सूचनांमध्ये नमूद केल्यानुसार करतील व त्याबाबतचा अहवाल आणि ठिबक सिंचन, तुषार सिंचन संच बसवल्याचे जिओ-टॅग केलेले फोटो प्रकल्पाच्या DBT App द्वारे घेऊन अपलोड करतील.

१४. प्रस्ताव निकषानुसार योग्य असल्यास लेखा अधिकारी (डेस्क ५) आणि संबंधित उपविभागीय कृषि अधिकारी (डेस्क ६) अनुदान अदायगीस अंतिम मंजुरी देतील.

१५. डेस्क ६ वरून अंतिम मंजूर करण्यात आलेल्या अनुदानाच्या रकमेनुसार तेवढ्याच रकमेचे प्रदान संबंधित विक्रेत्यास करणेबाबत वित्त विशेषज्ञ यांचेकडून संबंधित बँकेला सूचित केले जाईल.

१६. बँक स्तरावरून वित्त विशेषज्ञ यांच्याकडून कळविण्यात आलेली रक्कम संबंधित विक्रेत्याच्या CBDC वॉलेटमध्ये UNBLOCK केली जाईल आणि सदर रक्कम विक्रेत्याच्या वॉलेटमध्ये प्रत्यक्ष जमा होईल. त्यानंतर हि रक्कम विक्रेत्याला वापरास उपलब्ध होईल.

१७. पूर्वसंमती वेळी निर्माण करण्यात आलेल्या डिजिटल टोकनची रक्कम व प्रत्यक्षात अंतिम मंजुरी दिलेली रक्कम यामधील फरक पंजाब नॅशनल बँकेमार्फत प्रकल्पाच्या बँक खात्यात वर्ग (refund) केली जाईल.

१८. पूर्वसंमतीवेळी निर्माण करण्यात आलेल्या डिजिटल टोकनची रक्कम हि एक अंदाजित किंमत असून प्रत्यक्षात शेतकऱ्याने ठिबक सिंचन, तुषार सिंचन संच बसवून त्याची मोका तपासणी झाल्यानंतर मार्गदर्शक सूचनेनुसार देय होणारी रक्कम अंतिम असून तीच रक्कम संबंधित विक्रेत्याच्या CBDC वॉलेटमध्ये जमा करण्यात येईल.

१९. पूर्वसंमतीवेळी निर्माण करण्यात आलेल्या टोकनची रक्कम व प्रत्यक्षात अंतिम मंजुरी दिलेली रक्कम यामधील तफावत हि बाब संबंधित विक्रेता आणि शेतकरी यांच्या दरम्यानची खाजगी बाब असून त्यासाठी भारतीय रिझर्व बँक, कृषी विभाग आणि पंजाब नॅशनल बँक यांच्याशी संबंधित असणार नाही.

२०. प्रकल्पाकडून पूर्व संमती दिल्यानंतर शेतकऱ्याला डिजिटल टोकन हस्तांतरीत करण्यात आले अथवा त्याच्याकडून ते विक्रेत्याच्या CBDC वॉलेटमध्ये हस्तांतरित करण्यात आले, मात्र विहित मुदतीत प्रत्यक्ष मार्गदर्शक सूचनेनुसार काम पूर्ण करण्यात आले नाही तर BLOCK स्वरुपात असलेली अनुदानाची संपूर्ण रक्कम प्रकल्प व्यवस्थापन कक्षाच्या बँक खात्यात वर्ग (Refund) केली जाईल.

तरी वरील मार्गदर्शक सूचना आपल्या स्तरावरून सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून द्याव्यात व क्षेत्रीय स्तरावर सदरबाबत आवश्यक प्रचार प्रसिद्धी करण्यात यावी.

Digitally signed by
Minal Karanwal
Date: 02-06-2026
12:40:38

(मिनल करनवाल)
**प्रकल्प संचालक**
**नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प, मुंबई**

**प्रत- माहितीस्तव**

१. मा. सचिव (कृषी), महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
२. मा. आयुक्त (कृषी), कृषी आयुक्तालय, पुणे

महाराष्ट्र शासन
कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास
व मत्स्यव्यवसाय विभाग, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
Email ID: desk८a.agri-mh@mah.gov.in

क्रमांक : कृवपदुम-१९०४६/२२/२०२५-MAG-८A (E-१०७०१६४) दिनांक : १८ मे, २०२६

प्रति,

प्रकल्प संचालक,
नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प,
मुंबई-४०० ००५.

विषय:- नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प टप्पा-२ अंतर्गत सर्व २१ जिल्ह्यातील निवड केलेल्या ७२०१ गावांमध्ये असलेल्या अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती मधील शेतकरी लाभार्थी व सर्व महिला लाभार्थ्यांना ठिबक सिंचन व तुषार सिंचन या घटकास देय असलेले अनुदान वितरणासाठी "सेंट्रल बँक डिजिटल चलन (CBDC)" या कार्यपध्दतीचा अवलंब करण्याबाबत...

संदर्भ :- आपले पत्र क्र.NDKSP-१३०८०(३१)/३/२०२५-१३/E-१७७४९२१, दि.१०.०३.२०२६

महोदया,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प टप्पा-२ अंतर्गत नाशिक, नागपूर, चंद्रपूर, छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, लातूर, धाराशिव, परभणी, नांदेड, हिंगोली, जळगांव, अमरावती, अकोला, बुलढाणा, वाशीम, यवतमाळ, वर्धा, भंडारा, गोंदिया, व गडचिरोली या सर्व २१ जिल्ह्यांमधील निवड केलेल्या ७२०१ गावांमध्ये असलेल्या अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती मधील शेतकरी लाभार्थी तसेच सर्व महिला शेतकरी लाभार्थ्यांना ठिबक सिंचन व तुषार सिंचन या घटकास देय असलेले अनुदान वितरीत करण्यासाठी सेन्ट्रल बँक डिजिटल चलन (CBDC) या कार्यपध्दतीचा अवलंब करण्यास मान्यता देण्याबाबत वरील संदर्भीय पत्रान्वये प्रस्ताव प्राप्त झाला आहे. सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

२. "सेंट्रल बँक डिजिटल चलन (CBDC)" अंतर्गत अनुदान प्रदान करण्याच्या कार्यपध्दतीबाबत सविस्तर मार्गदर्शक सूचना आपल्या स्तरावरुन निर्गमित कराव्यात.

३. "सेंट्रल बँक डिजिटल चलन (CBDC)" या कार्यपध्दतीचा अवलंब करताना D.B.T. प्रणालीशी विसंगत कार्यपध्दतीचा अवलंब होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी. तसेच, सदर प्रणालीचा अवलंब करण्यात आल्यानंतर वेळोवेळी होणारी फलनिष्पत्ती, त्याच्याशी निगडीत तांत्रिक बाबी/विकसन याबाबतची तपशीलवार माहिती वेळोवेळी शासनास सादर करण्यात यावी, अशी आपणांस विनंती आहे.

आपला,

( ग.सं.कचरे )
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत : निवडनस्ती (कार्यासन-८ओ)